# समारोप

# समारोप

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीची मोठ्या प्रमाणात वाढ झाली. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज व थिऑसॉफिकल सोसायटी इत्यादी अनेक संप्रदायांनी ही सुधारणा चळवळ सुरु केली होती. महर्षी दयानंद सरस्वतींनी इ. स. १८७५ मध्ये मुंबई येथे स्थापन केलेल्या आर्य समाजाने सुरु केलेली सामाजिक व धार्मिक सुधारणेची चळवळ सर्वांना समानतेची शिकवण देणारी होती. मात्र आर्य समाजाची शिकवण व तत्त्वे तत्कालीन पुराणमतवादी लोकांना आवडली नाहीत. दयानंद सरस्वतींच्या पुणे येथील व्याख्यानाने तर सर्व लोक भारावून गेले. सनातनवादयांच्या प्रतिकाराला बळी न पडता महर्षी दयानंदांनी आपल्या आर्य समाजाचा उत्तरेकडील प्रदेशामध्ये प्रसार केला. मात्र दक्षिणेमध्ये तत्कालीन स्थितीत समाजाचा प्रसार होऊ शकला नाही. आर्य समाजाचा प्रसार महाराष्ट्रामध्ये म्हणजेच तत्कालीन मुंबई प्रांतात सुद्धा फारसा होऊ शकला नाही.

दक्षिणेच्या प्रदेशात आर्य समाजाची स्थापना सर्व प्रथम मराठवाडा विभागात झाली. मराठवाड्यात धारुर येथे सन १८९१ मध्ये स्थापन झालेली आर्य समाजाची शाखा ही मुंबईनंतरची समाजाची दुस-या क्रमांकाची शाखा होती. महर्षी दयानंदांना आपल्या विचारांचा प्रसार दक्षिणेच्या प्रदेशात करता आला नाही. तथापि त्यांच्या आर्य समाजाने हैद्राबाद राज्यामध्ये महत्त्वपूर्ण कार्य केले. धारुरनंतर इ. स. १८९२ मध्ये हैद्राबाद येथे आर्य समाजाची स्थापना झाल्यामुळे त्याचा निजामी राज्यात मोठ्या प्रमाणात प्रसार व प्रचार होऊ शकला. हैद्राबाद राज्यातील हिंदूंना आपल्या धर्माचे, धार्मिक हक्कांचे रक्षण करण्यासाठी एखादी संस्था हवी होती. ती आर्य समाजाच्या रुपाने त्यांना मिळाली. आर्य समाजाने मराठवाड्यात धार्मिक व सामाजिक जागृती घडवून आणून विविध धार्मिक व सामाजिक सुधारणा अमलात आणल्या. मराठवाड्यात शिक्षण प्रसार करण्याचे उल्लेखनीय कार्य आर्य समाजानेच केले. हैद्राबाद राज्यातील निजामाच्या

जुलमी राजवटीस व इस्लामीकरणाच्या धोरणास विरोध करुन बहुसंख्य हिंदू प्रजेच्या धार्मिक, सामाजिक आणि राजकीय हक्कांच्या प्राप्तीसाठी आर्य समाजाने सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब करुन मराठवाड्यात अनेक लढे उभारले. मराठवाड्यातील आर्य समाजाने हैद्राबाद मुक्ती संग्रामात स्पृहणीय कामगिरी बजावली. [१]

आर्य समाजाने भारतामध्ये वेदप्रचार, शुद्धीसंघटना, संस्कृत पाठशाळा, गुरुकुले, महाविद्यालये, कन्याशाळा, हायस्कूल्स, अनाथालये व विधवाश्रम इत्यादी अनेक संस्थानांच्याद्वारे भारतीय जनतेची सेवा केली आहे. आर्य समाजाने वेदप्रणीत आर्य धर्माचा पुरस्कार केला,वेदांत चातुवर्ण्य आणि अस्पृशता नाही हे निदर्शनास आणून दिले. आर्य समाजाने वेदाध्ययनाचा अधिकार सर्वांना दिला. मानवी समता हे आर्य समाजाचे तत्त्व होते. आर्य समाजाच्या या तत्त्वांमुळे व कार्यामुळे छ. शाहू महाराजांनी आर्य समाजाचा प्रचार व प्रसार महाराष्ट्रात अधिकाधिक व्हावा या हेतूने जानेवारी १९१८ मध्ये कोल्हापूरात आर्य समाजाची स्थापना केली व समाजाच्या वाढीसाठी कायमस्वरुपी सहाय्य केले. त्यामूळे आर्य समाजाला येथे राजाश्रय लाभला.

आर्य समाजाच्या स्थापनेनंतर शाहू महाराजांनी राजाराम हायस्कूल, राजाराम कॉलेज, ट्रेनिंग कॉलेज, पाटील - तलाठी क्लास वगैरे संस्था आर्य समाजाच्या ताब्यात दिल्या. समाजाने या संस्थांची उत्तम वाढ केली. राजर्षी शाहू महाराजांच्या निधनानंतर राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत सन १९२६ साली या सर्व शिक्षणसंस्था कोल्हापूर दरबारने पुन्हा आपल्या ताब्यात घेतल्या.

कोल्हापूर आर्य समाजाने शिक्षण संस्था उघडून शिक्षणप्रसाराचे कार्य केले. गुरुकुल, पाठशाळा, वैदिक शिक्षण, वृत्तपत्र इत्यादी माध्यमातून शिक्षणप्रसार व सांस्कृतिक जागृतीचे कार्य केले आहे. सर्व जातींच्या विद्यार्थ्यांना आर्य समाजाच्या शिक्षणसंस्थामध्ये जातींच्या विद्यार्थ्यांना आर्य समाजाच्या शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेश दिला जातो. गुरुकुलात रहाणे, जेवणे, शिक्षण अशी तिहेरी सोय होती. गरीब व मागासलेल्या

वर्गातील विद्यार्थ्यांना या शिक्षणसंस्थांचा खूपच उपयोग झाला आहे व होत आहे. त्याचप्रमाणे हिंदी भाषेचा प्रचार करण्याचे कार्यही आर्य समाजाने केले.

आर्य समाजाच्या सामाजिक कार्यामुळे जातीपातीची बंधने शिथील होऊ लागली. आंतरजातीय विवाहास प्रोसाहन मिळाले. आर्य समाजाने कोल्हापूरात जातीयता निर्मूलनाचे कार्य प्रभावीपणे पार पाडून सामाजिक समतेची शिकवण दिली. अस्पृशांच्या उद्धारासाठी प्रयत्न केले. अस्पृश्यता नष्ट व्हावी यासाठी स्पृश्य लोकांचे मत परिवर्तन केले. अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न केला गोरगरिबांची, पिडीतांची दु:खे दूर करण्याचा प्रयत्न आर्य समाजाने केला. धार्मिक क्षेत्रातही आर्य समाजाने चांगली कामगिरी बजावली. आर्य समाजातर्फे सामाजिक व धार्मिक जागृतीसाठी कोल्हापूरात तसेच आसपासच्या ग्रामीण भागात प्रवचने, व्याख्याने इत्यादी कार्यक्रम होत.आर्यसमाजाने शुद्धीकरणाचे काम मोठ्या प्रमाणावर केले. आर्य समाजाची स्थापना झाली तो काळ ब्रिटिश अमदानीचा होता. या काळात अमेरिकन मिशन-यांनी सर्व भागात ख्रिश्चनधर्माचा प्रचार चालू केला होता. या प्रचाराला आळा घालण्याचे काम आर्य समाजाने केले. आर्य समाजाने वैदिक धर्माचा प्रचार केला. त्यामुळे ख्रिश्चन धर्म स्विकारलेल्या लोकांचे मतपरिवर्तन होऊन त्यांनी परत हिंदू धर्माचा स्वीकार केला. हिंदू धर्मातील वर्णभेदाला कंटाळून अनेक हरिजनांनी ख्रिश्चन, इस्लाम धर्माचा स्वीकार केला होता.अशा बाटवलेल्या हरिजनांना (हिंदूना)पुन्हा वैदिक धर्मात प्रवेश मिळवून देण्यासाठी आर्य समाजाने शुद्धीकरण चळवळ सुरु केली होती. आर्य समाजाने धर्मांतरित लोकांना पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश मिळवून दिला.तसेच त्यांना स्वधर्माची जाणीव करुन दिली, त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न केले.

कोल्हापूरात आर्य समाजाच्या वाढीला व कार्याला प्रारंभापासून जी अनुकूलता निर्माण झाली त्याचे कारण म्हणजे समाजाला सर्वप्रथम राजर्षी शाहू छत्रपतींसारख्या पुरोगामी नृपतीचा लाभलेला आश्रय होय ! शाहू महाराजांनी आर्य समाजाची कोल्हापूरात

स्थापना करुन समाजाचा व्याप वाढावा, दैनंदिन कार्य सुरळीत व्हावे म्हणून सक्रीय सहाय्य केले. समाजाचे काम करण्यासाठी अनेक थोर विद्वान व त्यागी लोकांना आणविले. विशेषत: उत्तर हिंदुस्थानांतून आलेले कै. स्वामी परमानंदजी, आग्रा, कै.डॉ. कल्याणदास देसाई, मुंबई, कै. पं. आत्मारामजी, अमृतसर या आर्य समाजीस्ट विद्वानांचे मार्गदर्शन लाभले. या सर्वांनी प्रसारकार्यासाठी समाजाला मोठे सहकार्य केले. कै. रामभाऊ सबनीस, कै.व्ही. एस्. टेंगशे या स्थानिक कार्यकर्त्यांचीही आर्य समाजाला मोठी मदत झाली. सुरवातीच्या या काळातच श्री. डी. टी. मालक संस्थेत शिक्षण घेत होते. आर्य समाजाविषयी श्री. मालक यांना वाटणारी निष्ठा, प्रेम, तळमळ ही प्रारंभापासूनच वाढत आलेली होती.आणि त्याचे प्रत्यंतर पुढे संस्थेच्या अनेक उपक्रमात, अडीअडचणीच्या काळात त्यांनी उचललेल्या जबाबदारीत दिसून आले. शुद्धीकार्य, निधी, त्याचप्रमाणे शैक्षणिक प्रसार इत्यादी आर्य समाजाच्या कार्यात श्री. मालक यांनी जे कष्ट घेतले. ते फार मोलाचे आहेत.

१९२२ साली राजर्षी शाहू महाराजांचा देहांत झाल्यानंतर राजाराम महाराजांनीही तसाच राजाश्रय आर्य समाजास दिला व संस्थेस शक्य ती मदत केली. राजाराम कॉलेज चालविण्यासाठी डॉ. बाळकृष्णांसारखे श्रेष्ठ दर्जाचे प्राचार्य आणवून कोल्हापूर हे ख-या अर्थाने विद्येचे व ज्ञानाचे केंद्र बनविले. आजच्या शिवाजी विद्यापीठाचा येथेच पाया घातला गेला. परंतु १९४० साली राजाराम महाराजांचे निधन झाले आणि संस्थेचा जागृत राजाश्रय नाहीसा झाला. परंतु यानंतर संस्थेला लाभलेले अध्यक्ष डॉ. ए. सी. बोस, प्रो. जी एस्. देशपांडे, डॉ. एस्. व्ही. काटे यांनी पडत्या काळात संस्थेला सावरले. नंतरच्या काळातही दादासाहेब हळदकर, दत्ताजीराव शेळके, बाळासाहेब पाटील कौलवकर यांनी संस्थेला आर्थिक सुस्थिती आणून दिली.

दक्षिण महाराष्ट्रात कोल्हापूर हेच आर्य समाजाचे मोठे केंद्र होते. वैदिक धर्मप्रसार, अनाथांचे पालन - पोषण, अंधश्रद्धांचे उच्चाटन, शुद्धीकरण व अनाथ, गरीब

- दीनदलितांचे संगोपन व संवर्धनाचे कार्य केले आहे. परंतु दक्षिणेकडील प्रदेशात 'मराठवाडा' आर्य समाजाच्या प्रचारामध्ये आघाडीवर होता. मराठवाड्यात आर्य समाजाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला. मराठवाड्यात आर्य समाजाच्या अनेक शाखा स्थापन झाल्या होत्या. या सर्व शाखांतील प्रतिनिधींची मिळून 'आर्य प्रतिनिधी सभा' हैद्राबाद येथे स्थापन केलेली होती. या सभेची सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा दिल्ली या उत्तरेतील आर्य समाजी प्रमुख केंद्राबरोबर सांधेजोड करण्यात आली होती. या सभेने आयोजित केलेली काही अधिवेशने व संमेलने मराठवाडयात झाली. अशा प्रकारची सभा कोल्हापूरात नव्हती. कारण फक्त कोल्हापूरातच समाजाची शाखा होती. मराठवाडयातील आर्य समाजाने स्त्री जागृतीचे कार्यही केले.परंतु कोल्हापूर आर्य समाजाने स्त्री जागृतीसाठी काही खास प्रयत्न केल्याचे दिसत नाही. मराठवाड्यात 'श्रावणी वेद सप्ताह' साजरा केला जात होता. यावेळी प्रचार कार्यासाठी उपदेशक पाठविले जात असत. या सप्ताहामध्ये 'सत्यार्थ प्रकाश', वेद इत्यादीचे वाचन केले जात असे. कोल्हापूरात प्रत्येक वर्षी नारळी पौर्णिमेच्या दिवशी श्रावणी समारंभ होत असे. याशिवाय शास्त्रार्थाचा उपक्रम ( म्हणजे धार्मिक बाबीसंबंधीचा वादविवाद), साप्ताहिक सत्संग (यामध्ये वैदिक धर्मावर प्रवचने दिली जात), सत्यार्थ प्रकाश दिवस (प्रत्येक वर्षी महर्षी दयानंद निर्वाण महोत्सव प्रसंगी सत्यार्थ प्रकाश सप्ताह साजरा केला जातो. यात विद्वानांची व्याख्याने आयोजित करुन सत्यार्थ प्रकाशाचे महत्त्व विषद केले जाते.) असे कार्यक्रम कोल्हापूर आर्य समाजात साजरे केले जात नव्हते.

आर्य समाज चळवळीचा प्रसार फक्त कोल्हापूरातच जास्त झाला सत्यशोधक समाजासारखा या चळवळीचा सार्वत्रिक प्रसार झाला नाही. कारण आर्य समाजी पंडित सुधारणाप्रिय व वेद पारंगत होते; पण ते कर्मठ व आग्रही होते. होमहवन, स्नानसंध्या यावर त्यांचा अधिक भर असे. तसेच त्यांचे धार्मिक वाङ्मय, बहुजन समाजाला न समजणा-या संस्कृत भाषेत होते त्यामुळे बहुजन समाजाला त्याचे आकलन

होत नसे. शिवाय उत्तर हिंदुस्थानातील पंडितांची भाषा हिंदी,ती सुद्धा संस्कृतप्रचुर हिंदी असे.[२] त्यामुळे आर्य समाजाचा प्रसार कोल्हापूरपुरताच मर्यादीत होता अशी टीका करण्यात येते. मात्र अशी टीका जरी केली असली तरी हिंदी भाषेचा प्रचार हे आर्य समाजाचे एक ध्येय होते व सुरुवातीस आर्य समाजाची स्थापना झाली त्याकाळात आर्य समाजाचे प्रचारक उत्तरेतून आलेले होते. त्यांची मातृभाषा हिंदी असल्यामुळे त्यांचे व्याख्यान हिंदीतून असे. तरीही त्या व्याख्यानाचा मराठीतून अनुवाद सभेत केला जात असे. तसेच आर्य समाजाचा सार्वत्रिक प्रसार व्हावा यासाठी समाजामार्फत कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगाव जिल्ह्यात प्रचारक पाठविले जात होते व सामाजिक, धार्मिक जागृतीचे कार्य केले जात असे.

आर्य समाजाचा वेदप्रामाण्यावर अधिक भर होता. आर्य समाज सर्व ज्ञानाचा उगम वेदात आहे असे मानत असे. परंतु आर्य समाजाच्या या मताला सत्यशोधक समाजाने त्यांच्या हंटर पत्रातून विरोध दर्शविला आहे. तसेच श्री क्षात्रजगद्गुरुंनी वेद हे ईश्वरनिर्मित नसून मनुष्यनिर्मितच आहेत असे मत व्यक्त केले होते. आर्य समाजाच्या व्याख्यानमाला सुरु असताना ब्राह्मणेतर पक्षाची मोठी गर्दी असे. यावेळी सभेमध्ये गोंधळ होऊ नये म्हणून दुस-या कोणाला (व्याख्याते व अध्यक्षांशिवाय ) आपले स्वतंत्र विचार मांडण्याची परवानगी काही वेळेला दिली जात नसे. या आर्य समाजाच्या नियमाला सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते विरोध दशर्वित असत. उदा. कोल्हापूरमध्ये आर्य समाजाच्यावतीने होणा-या व्याख्यानमालेत फेब्रुवारी १९३० मध्ये दिवाकर शास्त्री यांचे अस्पृश्यता निर्मूलन या विषयावर व्याख्यान झाले. त्यात ते म्हणाले की, ‘ गावातील देवालयात एका ठराविक मर्यादेपर्यंत जाण्यास अस्पृश्य व इतर सर्व हिंदूंना परवानगी असावी’ या त्यांच्या विधानावर विचार मांडण्याची सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी परवानगी मागितली. परंतु आर्य समाजाने त्यांना परवानगी दिली नाही. याच भाषणात दिवाकर शास्त्रीनी इस्लाम व बौद्ध धर्माविषयी मांडलेले विचार सत्यशोधक समाजाच्या

कार्यकर्त्यांना आवडले नाहीत. त्यांनी हंटर या वृत्तपत्रातून त्या मताना विरोध दर्शविला. [३] यावरुन कोल्हापूरात सत्यशोधक समाज व आर्य समाज यांच्या कार्यात व विचारात समन्वयाचा अभाव असल्याचे आढळून येते.

असे असले तरी तत्कालीन परिस्थितीत कोल्हापूर आर्य समाजाने शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रात केलेले कार्य महत्त्वपूर्ण आहे. कोल्हापूर आर्य समाजाने आपल्या शिक्षणसंस्थामार्फत शिक्षणप्रसाराचे मोठे कार्य केले आहे.या शिक्षणसंस्थांमधून सर्व वर्गातील मुलांना मोफत शिक्षण दिले जात असे. त्यामुळे बहुजन समाजातील मुलांना शिक्षण घेण्याची अधिक सुविधा उपलब्ध झाली. आजही या शिक्षणसंस्थांचा फायदा गरीब व मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना तसेच जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर होत आहे. वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांच्या राहण्याची, जेवण्याची व शिक्षणाची मोफत सोय आहे. डॉ. बाळकृष्ण आर्य समाजाचे अध्यक्ष असताना दक्षिण महाराष्ट्रात कोल्हापूरला शिक्षणाचे मोठे केंद्र म्हणून मान्यता मिळाली. त्यांनी आपल्या १८ वर्षाच्या कारकिर्दीत राजाराम कॉलेजला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली, राजाराम कॉलेज एम्.ए.; एम्. एस्सी. पर्यंत शिक्षण देणारे मुंबई राज्यातील एक प्रथम श्रेणीचे कॉलेज म्हणून ओळखले जाऊ लागले. डॉ. बाळकृष्ण श्रेष्ठ इतिहासकारही होते. त्यांचा ' शिवाजी द ग्रेट ' हा चरित्र ग्रंथ त्यांच्या मोठ्या संशोधकवृत्तीचा द्योतक मानला जातो. आर्यसमाजाने शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याबरोबरच सामाजिक व धार्मिक क्षेत्रात केलेले कार्यही तत्कालीन परिस्थितीत महत्त्वाचे ठरले. आर्य समाजाने जातिभेद , अस्पृश्यता,विषमता, अंधश्रद्धा नष्ट करुन सामाजिक व धार्मिक समता प्रस्थापित करण्याचे व हिंदू धर्म प्रसाराचे मोठे कार्य केले. आर्य समाजाने शुद्धीकरणाचे कार्य मोठ्या प्रमाणावर केले. आर्य समाजाचे मंत्री डी. टी. मालक यांनी शुद्धीकरणाचे कार्य मोठ्या प्रमाणावर केले. तसेच त्यांनी आपले सर्व आयुष्य समाजाच्या कार्यासाठी

व्यतित केले. याप्रकारे आर्य समाजाने शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

हिंदी भाषेचा प्रसार हे आर्य समाजाचे ध्येय होते. कोल्हापूरात हिंदी भाषेचा प्रसार व्हावा म्हणून कोल्हापूर आर्य समाजाने आपल्या शिक्षणसंस्थामध्ये हिंदी शिकविण्याची सोय केली. त्याचप्रमाणे हिंदी भाषेच्या प्रसारासाठी कोल्हापूर आर्य समाजाने सन १९३४ मध्ये 'श्रीमंत दयानंद नि:शुल्क हिंदी विद्यालय' स्थापन केले. तसेच पुढे हिंदी प्रचार मंडळ स्थापन केले. या मंडळामार्फत ग्रामप्रचार वर्ग चालविले जात होते. याप्रकारे कोल्हापूर आर्य समाजाने स्वातंत्र्यपूर्वकाळात राष्ट्रभाषा हिंदीच्या प्रचाराने मोठे कार्य केले.

आर्य समाज मुस्लीम विरोधी मानण्यात येत असे. ज्या - ज्या ठिकाणी आर्य समाजाचा प्रभाव वाढला त्या - त्या काळात हिंदू - मुस्लीम तणाव निर्माण होत असे. प्रसंगी जातीय दंगे भडकत असत. कोल्हापूरात मात्र जातीय तणाव वाढले नाहीत, हिंदू-मुस्लीम दंगली झाल्या नाहीत. याचे कारण म्हणजे राज्यकर्त्यांचे पुरोगामी सामाजिक धोरण व आर्य समाजाचे विधायक लोकोपयोगी कार्य होय. आर्य समाजाचा कोल्हापूरच्या सार्वजनिक जीवनात काही काळ चांगला प्रभाव असल्याचे आढळते.

# संदर्भ

१. कदम ना. ज्ञा. - ‘ मराठवाड्यातील आर्य समाजाची चळवळ’,
अप्रकाशित एम्. फिल्. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डिसेंबर १९८८.
पृ. २०१ - २१०.

२. नाईक तु. बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, पृ. ५२.

३. हंटर, ११ फेब्रुवारी १९२७, १८ मे १९२८, २१ फेब्रुवारी १९३०.